# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

### परिपत्रक क्र. ११४/२०२०

विषय : विद्यापीठ सेवकांसाठी गृहकर्जावरील व्याज योजनेबाबत.

संदर्भ : १) परिपत्रक क्र. २६२/२००३, दि. १७ जुलै, २००३

२) परिपत्रक क्र. १८१/२००८, दि. ०९ एप्रिल, २००८

३) परिपत्रक क्र. ४४१/२००८, दि. २६ नोव्हेंबर, २००८

४) परिपत्रक क्र. ७८/२०११, दि. २२ जून, २०११

५) परिपत्रक क्र. वित्त/२०१८-१९/१००० दि. २२ सप्टेंबर, २०१८

६) परिपत्रक क्र. ८८/२०१९, दि. ९ मे, २०१९

विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना लागू करण्यात आलेल्या गृहकर्जावरील व्याज योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने यापूर्वीच घेतलेला असून याबाबतचे परिपत्रक वित्त/२०१८-१९/१०००, दि. २२ सप्टेंबर,२०१८ नुसार सदर योजनेची रुपरेषा जारी करण्यात आलेली आहे.

परिपत्रक वित्त/२०१८-१९/१०००, दि. २२ सप्टेंबर,२०१८ यातील मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने आणि इतर बाबीविषयी निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. समितीने केलेल्या अहवालातील शिफारशी विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली असून त्या खालीलप्रमाणे.

१. परिपत्रकामधील मुद्दा क्र. ३ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. यामध्ये विद्यापीठ सेवक गृहकर्जास प्रथम अर्जदार असल्यास २% व्याज सवलत व द्वितीय अर्जदार असल्यास १% व्याज सवलत देण्यात येईल याऐवजी विद्यापीठ सेवक गृहकर्जास प्रथम अथवा द्वितीय अर्जदार असल्यास २% व्याज सवलत देण्यात येईल.

२. द्वितीय अर्जदार असल्यास १% व्याज सवलत सन २०१८-१९ पासून लागू होती याऐवजी २% व्याज सवलत सन २०१८-१९ पासून देण्यात येईल.

३. गृहकर्जाच्या कागदपत्रांमध्ये इंडेक्स-II ची प्रत नसेल तर अशावेळी सदर वास्तुचा महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यांनी मंजूर केलेला Sanctioned Plan ची प्रत जोडण्यात यावी.

आर्थिक वर्ष २०१९-२० साठी ऑनलाईन पध्दतीने माहिती भरण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आलेले असून यामध्ये माहिती भरावयाची आहे याकरीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाऊन पुढीलप्रमाणे माहिती भरण्यात यावी.

www.unipune.ac.in ⟶ Administration ⟶ Administration(Teaching)/ Administration (Non-Teaching) ⟶ Human Resource Management System ⟶ Login ⟶ User Name ⟶ Password ⟶ Services ⟶ Housing Loan Interest Reimbursement Request ⟶ Circular ⟶ Special Instructions ⟶ Dashboard ⟶ Apply for Housing Loan Interest (fill the Information) ⟶ Upload Scanned Documents ⟶ View Details /Take Print

पोर्टलवर 1) Index II, 2) Housing Loan Sanction Letter, 3) Current Year Interest Certificate PDF Format मध्ये अपलोड करावयाचे आहे. Index II, Housing Loan Sanction Letter हे पहिल्या वर्षीच अपलोड करावयाचे आहे. त्यानंतर दरवर्षी Current Year Interest Certificate अपलोड करावयाचे आहे. Undertaking फॉर्म Auto Generate होईल.

संपूर्ण फॉर्म भरुन झाल्यानंतर त्याचे प्रिंटआऊट घेवून त्यावर स्वाक्षरी करून त्यासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडण्यात यावी व फॉर्म शिक्षकेतर सेवकांनी प्रशासन शिक्षकेतर कक्ष व शिक्षकांनी प्रशासन शिक्षक कक्षाकडे जमा करावा.

| | | |
|---|---|---|
| 1) Index II | : | Submit only 1st year |
| 2) Housing Loan Sanction Letter | : | Submit only 1st year |
| 3) Interest Certificate (Original) | : | Every year |
| 4) Undertaking | : | Every year |
| 5) Bank Certificate for clearance of first loan | : | If Required |

प्रशासन शिक्षकेतर कक्ष व शिक्षक कक्ष सदर फॉर्म तपासून वित्त व लेखा विभागास सादर करतील. वित्त व लेखा विभाग तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करेल. तरी सर्व सेवकांनी दिलेल्या सूचनेनुसार गृहकर्ज व्याज योजनेचे फॉर्म दरवर्षी ९ जून, २०२० ते १० सप्टेंबर २०२० या कालावधीत भरुन सहकार्य करावे. या कालावधीनंतर सदर पोर्टल बंद ठेवण्यात येईल.

ABPadankar 09/06/2020

(सीए अतुल पाटणकर)
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०२०-२१/18
दिनांक : ९ जून, २०२०

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
१. मा. विभागप्रमुख )
सर्व शैक्षणिक विभाग, )
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ )
२. मा. शाखाप्रमुख )
सर्व प्रशासकीय शाखा, )
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ )

यांना विनंती करण्यात येते की, आपल्या विभागामधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास सदरचे परिपत्रक आणावे.

# सूचना

## For 1st Year

पोर्टलवर माहिती भरण्यापूर्वी खालील कागदपत्रे PDF Format मध्ये अपलोड करण्यासाठी फाईल तयार असावी.

| | | |
|---|---|---|
| 1) Index II | : | Submit only 1st year |
| 2) Housing Loan Sanction Letter | : | Submit only 1st year |
| 3) Interest Certificate (Original) | : | Every year |
| 4) Bank Certificate for clearance of first loan | : | If Required |

## For Next Year

पोर्टलवर माहिती भरण्यापूर्वी खालील कागदपत्र PDF Format मध्ये अपलोड करण्यासाठी फाईल तयार असावी.

| | | |
|---|---|---|
| Interest Certificate (Original) | : | Every year |